NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २२.१०.२०२६ गुरूवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २१.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून एकुण ६००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०६ केसमध्ये १७ ईसमावर कारवाई करून एकुण ६,०३,८२०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक २१.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २२.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये **कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ ईसमावर** कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये २८ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ३७ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २७ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ४८ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ३८ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०८ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ८८ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०१ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०९ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०१ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ७२६ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे १३ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ०८ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,०६२ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. २,२६,२००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :– गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २२.१०.२०२६ चे ०१.५० वा. ते ०२.०५ वा. चे दरम्यान, यशोधरानगर पोलीसांनी मिळालेल्या माहीतीवरून पोलीस ठाणे हद्दीत, पिवळी नदी, बुध्द विहार जवळ, सार्वजनिक रोडवर सापळा रचुन, एका अशोक ले–लॅण्ड ट्रक क्र. एम.एच. ४० सि.टी ०४४० ला थांबविले असता, ट्रकचालक व एक ईसम ट्रक सोडुन पळुन गेले. वाहनातील क्लीनर यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव शेख ईब्राहीम कुरैशी शेख बाबु कुरैशी, वय ३४ वर्षे, रा. गल्ली नं. ८, बंदे नवाज नगर, यशोधरानगर, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता, त्यामध्ये लहान–मोठी २५ जिवंत गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निदर्यतेने

चारा–पाणी न देता बांधुन ठेवल्याचे दिसुन आले. क्लीनर यास नमुद गोवंशीय जनावरे बाबत कागदपत्रे मागीतली असता, कोणीतीही कागदपत्रे न सादर केली नाही व नमुद जनावरे ही पाहीजे आरोपी नामे शहजाद नावाचा ईसम वय ३५ वर्षे, रा. टिपु सुल्तान चौक, यशोधरानगर याचे असल्याचे सांगीतले. तसेच पळुन गेलेले ईसमांपैकी एक शहजाद व दुसरा वाहनचालक रोहीत नावाचा ईसम वय ३० वर्षे, रा. कामगार नगर, कपील नगर असे असल्याचे सांगीतले. आरोपी हे गोवंशीय जनावरे यांना कत्तली करीता नेत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन २५ गोवंशीय जनावरे किंमती ७,५०,०००/–रू. चे व ट्रक असा एकुण किंमती अंदाजे १७,५०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गोवंशीय जनावरे यांना गौशाला येथे दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलीस ठाणे यशोधरानगर येथे ट्रकचालक, क्लीनर व शहजाद तसेच, ट्रकमालक यांचेविरूध्द कलम २९१ भा. न्या.सं., सहकलम ११(१)(ड) प्राणी क्रुरता अधिनियम–१९६०, सहकलम ४७(अ), ५६(क) प्राणी परीवहन नियम–१९७८, सहकलम ८३/१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. एका आरोपीस अटक केली आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग), वपोनि. युनुसचॉद शेख यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. अनंत पाटील, शशीकांत नागरगोजे, पोहवा. राहुल बोंद्रे, पोअं. संदीप वानखेडे, शितेष चौरसिया, मनिष झरकर, गोकुळ पवार व आशिष पिल्ले यांनी केली.

(गुन्हे)

१) वाडी पोलीसांची कामगिरी :– हद्दपार ईसमास अटक.

दिनांक २२.१०.२०२६ चे ०४.०० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगार तपासणी मोहीमे दरम्यान पेट्रोलींग करीत असता, त्यांना चंद्रमणी चौक, आंबेडकर नगर, बुध्द विहार जवळ राहणारा हद्दपार इसम जितेंद्र उर्फ जुगनु छोटु वेलंगे, वय २८ वर्षे, हा त्याचे राहते घरी मिळुन आला. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७२६/२०२४ दिनांक १५.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. राहुल नागदेवे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. उत्तम जायभाये यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे धंतोली :–शस्त्र बाळगुन धुमधुम करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २१.१०.२०२६ चे २०.४५ वा. चे सुमारास, धंतोली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळाली की, न्युरॉन हॉस्पीटल मागील धंतोली अंडरब्रिजखाली, मेट्रो पिल्लर क्र. पि. २९७ जवळ एक ईसम लोकांना शिवीगाळी करीत आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम हातात शस्त्र घेवुन येणाऱ्या–जाणाऱ्या लोकांना शिवीगाळी करतांना दिसल्याने, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. व निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव विजय सुरेश जैस्वाल, वय ४० वर्षे, रा. पार्वती नगर, अजनी, नागपुर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती १००/– रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून शिवीगाळी करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. शैलेष मोहन गौर, यांनी दिलेल्या

तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे मपोउपनि. प्रिती पटले यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे सिताबर्डी :– गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २१.१०.२०२६ चे १६.५० वा. चे सुमारास, फिर्यादी चे वडील नामे गुंडेराव ठाणे, वय ७० वर्षे, रा. योगराज अपार्टमेंट, भरत नगर, अंबाझरी, नागपुर हे त्यांचे सायकलने पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत सिताबर्डी किल्ल्या समोरील सार्वजनिक रोडने जात असतांना, त्यांचे मागुन येणाऱ्या एका ॲक्टीवा मोपेड क्र. एम.एच ४९ बि.टी ५४२१चे चालकाने त्याचे ताब्यातील मोपेड भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांचे सायकलला धडक देवुन त्यांना गंभीर दुखापत करून, घटनास्थळावरून पळुन गेला. लोकांनी जखमी यांना उपचाराकरीता डॉ. विवेक गाडगे यांचे हॉस्पीटल येथे दाखल केलेले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी निखील गुंडेराव ठाणे, वय ४० वर्षे, रा. फ्लॅट नं. बि. १, योगराज अपार्टमेंट, भरत नगर, अंबाझरी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. देवानंद वाघमारे ९८९०२०१८६१ यांनी आरोपी मोपेड चालकाविरूध्द कलम २८१, १२५(अ), १२५(ब) भा.न्या.सं. सहकलम १३४, १७७, १८४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. मोपेड चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.